# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** म.न.पा. ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** नुसार ''उपद्रव शोध पथक'' अंतर्गत १५१ लष्कारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती करण्याबाबत महासभेची मान्यता प्राप्त होती. त्यात ५० कर्मचारी भरती करून २०१ ची मान्यता म.न.पा सर्व साधारण सभेचे ठराव क्र. ४७ दि १८/०२/२०२१ अंतर्गत दिली आहे. त्यानुसार ३ टप्यात सेवानिवृत्त लष्कारी कर्मचारी यांना ''उपद्रव शोध पथकात'' घेण्यात आले. मध्यांतरी २०१ पैकी ७४ कर्मचारी पथक सोडून गेले असल्याने आज मनपात एकुण १२७ लष्करी कर्मचारी ''उपद्रव शोध प्रथक'' मध्ये सध्या कार्यरत आहेत.

मनपा मध्ये कार्यरत १२७ लष्करी कर्मचारी पैकी ५७ लष्करी कर्मचारी यांचा कार्यकाळ दि. ०२.०६.२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. या कर्मचाऱ्यांना २ दिवसाचे तांत्रिक खंड देवुन पुढिल ११ महिण्याचा कार्यकाळ वाढविणे व नव्याने करार करणे करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्याचे पुढिल ११ महिण्याचे वेतनवर रू.१,८१,९४,०००/— खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च पद क्र. A 24001221905 मधुन मागविण्यात येईल.

वरील प्रमाणे प्रस्ताव मा. प्रशासक यांचे मान्यतेस सादर.

टिप:— सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 853/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 06/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार म.न.पा. ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७ नुसार ''उपद्रव शोध पथक'' अंतर्गत १५१ लष्कारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती करण्याबाबत महासभेची मान्यता प्राप्त होती. त्यात ५० कर्मचारी भरती करून २०१ ची मान्यता म.न.पा सर्व साधारण सभेचे ठराव क्र. ४७ दि १८/०२/२०२१ अंतर्गत दिली आहे. त्यानुसार ३ टप्यात सेवानिवृत्त लष्कारी कर्मचारी यांना ''उपद्रव शोध पथकात'' घेण्यात आले. मध्यांतरी २०१ पैकी ७४ कर्मचारी पथक सोडून गेले असल्याने आज मनपात एकुण १२७ लष्करी कर्मचारी ''उपद्रव शोध प्रथक'' मध्ये सध्या कार्यरत आहेत.

मनपा मध्ये कार्यरत १२७ लष्करी कर्मचारी पैकी ५७ लष्करी कर्मचारी यांचा कार्यकाळ दि. ०२.०६.२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. या कर्मचाऱ्यांना २ दिवसाचे तांत्रिक खंड देवुन पुढिल ११ महिण्याचा कार्यकाळ वाढविणे व नव्याने करार करणे करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्याचे पुढिल ११ महिण्याचे वेतनवर रू.१,८१,९४,०००/— खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च पद क्र. A 24001221905 मधुन मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.